विषय:-लोकसभा निवडणुक २०१९ च्या
कामाकरिता तात्पुरत्या स्वरूपात वर्ग
केलेल्या वाहनावरील वाहनचालकांच्या
अति.भत्त्याबाबत.....

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी-४११०१८ लेखा विभाग**
**क्र.लेखा/१अ/कावि/७०२५ /२०१९ दिनांक ०५ /०८/२०१९**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील विविध वाहने वाहनचालकांसह लोकसभा निवडणुक २०१९ च्या कामकाजासाठी दि.११/३/१९ ते २७/५/१९ या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये वाहनचालक कर्मचा-यांनी केलेल्या जादा कामाचा मोबदला (अति.भत्ता) मनपाने ठरविलेले धोरण व प्रचलित नियमानुसार अदा करण्याची मागणी महापालिका महासंघाद्वारे केलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचेकडील दि.१९/६/१९ च्या पत्राच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांनी यासंदर्भात खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

**प्रत्येक वाहनचालकाने केलेल्या कामकाजावर निवडणुक कार्यालयाकडुन भत्ता अदा न केलेबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. तसेच त्या वाहनचालकाने केलेले अतिरिक्त कामाचे तास निवडणुक अधिका-यांकडुन प्रमाणित करून घेवुन अदा करावे.**

सबब, मा.आयुक्त यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या आदेशानुसार संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करून अतिकालीन भत्ता बिले लेखा शाखेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत यावीत.

**मुख्य लेखा अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८

प्रति,

१) सर्व संबंधित विभागप्रमुख / शाखाप्रमुख
२) सर्व संबंधित लेखाधिकारी/लेखापाल/उपलेखापाल

Scanned by CamScanner